# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेंतर्गत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रासाठी इमारत बांधण्याबाबत**

**(१) ६८१५६ (२७-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेंतर्गत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात परिचराची १७ व जीप चालकाची १६ पदे रिक्त असुन या प्राथमिक आरोग्य केंद्राला पक्की इमारत नाही तसेच मौजे बोधडी (ब्रु) या मोठ्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन डॉक्टरांची नेमणूक असतांना एकच डॉक्टर प्रतिनियुक्तीवर असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त असलेली डॉक्टरांची पदे भरुन प्रा.आ. केंद्रासाठी पक्की इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

किनवट तालुक्यामध्ये ९ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६५ उपकेंद्र कार्यरत आहेत. किनवट तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रात वाहन चालकांची १८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १६ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. तसेच, परिचरांची ६७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४३ पदे भरलेली असून २३ पदे रिक्त आहेत.

किनवट तालुक्यात सर्व ९ प्राथमिक आरोग्य केंद्रांना पक्क्या इमारती आहेत. तसेच ६५ उपकेंद्रापैकी ५८ उपकेंद्राच्या इमारती पक्क्या आहेत. उर्वरीत उपकेंद्रांना इमारती नाहीत.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र बोधडी (बु) ता.किनवट येथे वैद्यकिय अधिकारी, गट-अ संवर्गाची दोन पदे मंजूर असून सद्य:स्थितीत या दोन्ही पदावर वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्राची जुनी इमारत पाडून निर्लेखित करण्याबाबत तसेच नवीन इमारत बांधकामाबाबत प्रशासकीय कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या शेकडो मजूरांना प्रलंबित मजूरी देण्याबाबत**

**(२) ७०६०३ (२७-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणा-या शेकडो मजूरांची मजूरी त्यांना अद्यापही मिळाली नाही तसेच साहित्य खरेदीचे पावणेसहा कोटी रुपये ही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार या मजूरांना तातडीने मजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सद्यस्थितीत मजुरांची मजुरी वेळेवर करण्यात येत असून संबंधित प्रलंबित प्रदाने निधी प्रदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात आली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनकिन्होळा (ता. सिल्लोड ,जि.औरंगाबाद) येथील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(३) ९०४०० (२२-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बनकिन्होळा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील स्मशानभूमिकडे जाणाऱ्या नदीपात्रातील रस्त्यावर सर्वे केलेल्या जागी पुल न बांधता रस्ता बाजूला सोडून दुसरीकडे पुल बांधण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) याबाबत कोणीही दोषी नसल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीमधील विद्यार्थ्यांप्रमाणे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रतिपूर्ती देण्याबाबत**

**(४) ९५७६५ (०२-०१-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या केवळ ६०५ अभ्यासक्रमांनाच शिष्यवृत्ती व प्रतिपूर्ती देण्याचा माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या एम.टेक,एमबीए इ.व्यावसायिक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती व प्रतिपूर्तीमधून वगळण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,अनुसुचित जाती व अनु.जमातींच्या विद्यार्थ्यांना जवळपास विविध १३०० अभ्यासक्रमांना शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीमधील विद्यार्थ्यांप्रमाणे प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सर्व अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती व प्रतिपूर्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-१०-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) या विभागाशी संबंधित नाही.

(४) व (५) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता ५४४ अभ्यासक्रमांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी अनुज्ञेय आहे.

---

**सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील घोषित केलेल्या योजनांचा शासन निर्णय संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यास लागत असलेला विलंब**

**(५) ९६२१२ (०६-०१-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील घोषित केलेल्या योजनांचा अद्याप पर्यंत शासन निर्णय संबंधित विभागाकडून निर्गमित केले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घोषित केलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यात अडथळे येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्याप पर्यंत योजनांचे शासन निर्णय निर्गमित न करणारे शासनाचे विभाग कोणते तसेच अर्थसंकल्प मांडून जवळपास ८ महिने होऊन देखील योजनांचे शासन निर्णय निर्गमित न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सन २०१७-१८ मधील घोषित योजनांची अंमलबजावणी तात्काळ पूर्ण करण्यासह योजनांचा शासन निर्णय निर्गमित करण्यास व अंमलबजावणी करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील घोषणांच्या अनुषंगाने पणन उप विभागाच्या ४ घोषणा, तसेच पदुम व पर्यटन उप विभागांची प्रत्येकी एक घोषणा याप्रमाणे एकूण ६ घोषणा वगळता उर्वरित सर्व घोषणांबाबत आवश्यक बाबींच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, विकास आराखडयास मंजूरी, मा.मंत्रीमंडळाची मान्यता घेणे व आवश्यक शासन निर्णय निर्गमित करणे याबाबत आवश्यक कार्यवाही केली आहे. पणन उपविभागांतर्गतच्या घोषणांच्या अनुषंगाने कृषी पणन मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तर पदुम उप विभागाच्या घोषणेच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच पर्यटन उप विभागाच्या घोषणेच्या अनुषंगाने कार्यवाहीसाठी प्रस्ताव विभागाच्या विचारार्थ आहे.

---

**जळगांव जिल्हयातील नदीजोड योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी देण्याबाबत**

**(६) १००७५५ (०२-०१-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील नदीजोड योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीजोड योजनेकरिता किती निधीची तरतूद करण्यात येणार आहे व जिल्हयातील कोणकोणते प्रकल्प पूर्ण होणार आहेत,
(३) असल्यास,जळगांव जिल्हयातील नदीजोड योजनेसाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०९-२०१८) :** (१) होय.

(२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव या महामंडळाअंतर्गत एकूण २८ नदीजोड प्रकल्पाना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यापैकी १ प्रकल्प वनजमिनीच्या अडचणीमुळे व १ प्रकल्प शेतकऱ्यांच्या हरकतीमुळे सुरु झालेले नाहीत. उर्वरित २६ प्रकल्पांपैकी १० प्रकल्प भौतिक दृष्ट्या पूर्ण आहेत. उर्वरित २ प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी व १६ प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यासाठी रु. ३५.६९ कोटी निधीची आवश्यकता आहे. निधी उपलब्धतेनुसार अपूर्ण प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यात येईल.

(३) सदर कामे लेखाशीर्ष बंद झाल्यामुळे सन २०११ पासून निधी अभावी बंद होते. कामे सुरु करण्याकरिता संबंधित लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांची मागणी होत असल्याने शासन निर्णय दि. २३/०८/२०१७ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ६ प्रकल्पांचे सु.प्र.मा. अहवाल जिल्हाधिकारी, जळगांव, यांचे कार्यालयामार्फत नियोजन विभागाच्या दि. १६/०२/२००८ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार शासनास मान्यतेसाठी सादर केले आहेत. तसेच उर्वरित १० प्रकल्पांचे सु.प्र.मा. प्रस्ताव अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. सद्यस्थितीत नदीजोड प्रकल्पाचे लेखाशिर्ष नियोजन विभागामार्फत सुरु करण्यात आले असून शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला वाटपाचे काम विशेष भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ए.एन.एम. व जी.एन.एम. या नर्सिंग कोर्स शिकणाऱ्या विजाभज, विमाप्र व इ.मा.व प्र वर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(७) १०११९८ (०६-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ए.एन.एम./जि.एन.एम. या नर्सिंग अभ्यासक्रमासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रतिपूर्वी योजनेचा विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ बंद केल्याने पुन्हा सदर योजना सुरु करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनीधींनी मा.सामाजिक न्यायमंत्री यांना दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रतिपूर्वी योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार ए.एन.एम/ जी.एन.एम या अभ्यासक्रमासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची योजना लागू नाही.

---

**स्वदेश दर्शन सहाय्य निधी योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयाला प्राप्त झालेल्या निधीबाबत**

**(८) १०५२८८ (०७-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या स्वदेश दर्शन योजनेंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयासाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी आतापर्यंत (डिसेंबर २०१७ अखेर) एकूण किती निधी प्राप्त झालेला आहे,
(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून सिंधुदुर्ग जिल्हयातील (तालुका निहाय) किती व कोणकोणती कामे हाती घेण्यात आली आहे व त्यासाठी प्रत्येकी किती निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे,
(३) असल्यास,सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून स्वीकारलेली कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने "स्वदेश दर्शन" योजनेंतर्गत महाराष्ट्राच्या "सिंधुदुर्ग कोस्टल सर्किट" या प्रकल्पासाठी रुपये ८२.१७ कोटी एवढ्या रकमेस मान्यता दिलेली असून रुपये १२.७९ कोटी इतका निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत केला आहे.
(२) सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून सिंधुदुर्ग जिल्हयातील हाती घेण्यात आलेली कामे व त्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | स्थळ | सोयी सुविधा | मंजूर निधी (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | विजयदुर्ग | तरंगते कॉटेज, पर्यटक माहिती केंद्र, प्रसाधन गृह, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, पदपथे, जेट्टीची श्रेणीवाढ, हाऊस बोट, तरंगती जेट्टी, रस्त्यालगत इतर सोयीसुविधा | १६.२१ |
| २ | देवगड | निरीक्षण टॉवर, उपाहार गृह, जेट्टीची श्रेणीवाढ, पर्यटक माहिती केंद्र, तंबु निवासाचा जोता व इतर सोयी सुविधा | ६.४८ |
| ३ | मिठबाव | प्रसाधन गृह, वाहनतळ, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, आपात्कालीन बचाव यंत्रणा व इतर सोयीसुविधा | ६.१७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | तारकर्ली | प्रसाधन गृह, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, आपत्कालीन बचाव यंत्रणा, रस्त्यालगत सोयी सुविधा | १०.२३ |
| ५ | तोंडवली | इंडोनेशियन कॉटेज, प्रसाधन गृहे, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, आपत्कालीन बचाव यंत्रणा, वाहनतळ, पर्यटक माहिती केंद्र, तंबु निवासाचा जोता, रस्त्यालगत सोयी सुविधा | १२.६८ |
| ६ | निवती किल्ला | प्रसाधान गृह | ०.२२ |
| ७ | शिरोडा | इंडोनेशियन कॉटेज (लॉग हट्स), प्रसाधन गृहे, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, आपत्कालीन बचाव यंत्रणा, पर्यटक माहिती केंद्र | ९.७५ |
| ८ | सागरेश्वर | इंडोनेशियन कॉटेज (लॉग हट्स), प्रसाधन गृहे, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, आपत्कालीन बचाव यंत्रणा, पर्यटक माहिती केंद्र | ८.७९ |
| ९ | मोचेमाड | प्रसाधन गृह, पदपथे, समुद्र किनाऱ्याचे सौंदर्यीकरण, गजिबो, समुद्र किनाऱ्यावर निरीक्षण टॉवर, वाहनतळ, तंबु निवासाचा जोता, आपत्कालीन बचाव यंत्रणा, पर्यटक माहिती केंद्र, रस्त्यालगत सोयी सुविधा | ६.५३ |
| | | दिशादर्शक फलक | १.२० |
| | | इतर शुल्क | ३.९१ |
| | | एकूण | ८२.१७ |

(३) व (४) वरील कामांच्या अनुषंगाने प्रकल्पातील स्थळे सीआरझेड बाधित असल्याने त्यास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अ‍ॅथॉरिटी (MCZMA) व स्टेट एन्व्हारनमेंट इम्पॅक्ट असेसमेंट अ‍ॅथॉरिटी (SEIAA) ची मान्यता घेण्यात आली आहे. सागरेश्वर, तारकर्ली, मिठबाव व विजयदुर्ग या ४ ठिकाणच्या कार्यान्वयनासाठीची ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

---

**राज्यातील पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या**
**थकीत विक्री कराची वसूली करण्याबाबत**

**(९) १०५७९० (०४-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर),**

**श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्च, २०१६ अखेर प्रलंबित असलेल्या विक्री कराची दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या माहितीनुसार राज्यात मूल्यवर्धीत विक्री कराची (व्हॅट) ८० हजार ५०५ कोटी तर मुंबई विक्रीकर अधिनियमाची (बीएसटी) २६ हजार ९९७ कोटी अशा सुमारे १ लाख ७ हजार ५०२ कोटी रुपयांच्या थकबाकीची वसूली करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित महसूलाची वसूली करण्याकरिता आयकर विभाग, पोस्ट ऑफिस, पोलीस स्टेशन यांच्या मदतीची फलनिष्पती काय आहे व प्रलंबित महसूलाच्या वसूलीकरिता जमीन महसूल अधिनियमातंर्गत व्यापाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती व लिलाव याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार थकबाकीची वसूली करण्यास विलंब लावणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही. विक्रीकर विभागातील राज्यातील दि.०१.०४.२०१६ रोजी प्रलंबित असलेल्या महसूल थकबाकी १ लाख ७ हजार ५०२ कोटी पैकी मूल्यवर्धित विक्रीकराची (व्हॅट) रु.४३,७२२.०५ व मुंबई विक्रीकर अधिनियमाची (बीएसटी) रु.२३,६२५.८८ अशी एकूण रु.६७,३४७.९३ कोटी इतकी मार्च २०१८ अखेर शिल्लक बाकी आहे. याचाच अर्थ मागील दोन वर्षात अपिल आदेश, निर्धारणा रद्द आदेश, चुकदुरुस्ती आदेश, प्रत्यक्षात वसूली अशा विविध कारणाने एकूण ४०,१५४.०७ कोटीच्या थकबाकीचा निपटारा करण्यात आला.

(२) विलंब झालेला नाही, तथापि थकबाकी संबंधी सर्व स्त्रोताकडून माहिती मिळवणे ही निरंतर प्रक्रिया आहे. मागील दोन वर्षात विविध कार्यवाहीद्वारे एकूण ६६३२.०६ कोटी इतकी प्रत्यक्ष वसूली झाली आहे. जमिन महसूल अधिनियमांतर्गत कारवाई करण्याचे व महसूलाच्या वसूलीकरिता जमीन महसूल अधिनियमातंर्गत व्यापाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती व लिलाव करण्याचे अधिकार वस्तू व सेवाकर विभागास आहेत. त्यानुसार एकूण १४,८९२ प्रकरणात रु.१५,८१२.७५ कोटी वसूलीसाठी कार्यवाही सुरु आहे.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

**मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील ठेकेदाराने मेरा शिवारातून पाटाचे केलेले अपूर्ण खोदकाम**

**(१०) १०६४९८ (१३-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा विभागाच्या अधिका-यांनी कंत्राटदारामार्फत मेरा शिवारातून पाटाचे ठिकठिकाणी अर्धवट खोदकाम केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेक शेतात पूलाचे बांधकाम केल्याने शेतक-यांना शेतीच्या नुकसानीचा मोबदला मिळालेला नाही तसेच शेतीला पाटाचे पाणीही नसल्याने याबाबत वरिष्ठ विभागाकडून चौकशी करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी संबधित अधिका-यांकडे केली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांच्या मागण्यां पूर्ण करण्यासह मेरा शिवारातून पाटाचे खोदकाम अर्धवट करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-१०-२०१८) :** (१) मेरा शिवारातून भूसंपादना अभावी पाटाचे सा. क्र. ८१५० ते १३७२० मी. पर्यंत दोन गट वगळता खोदकाम माहे मार्च, २०१८ मध्ये झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे. ग्रामस्थांनी जमिनीचा मोबदला मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तथापि शेतीला पाटाचे पाणीही नसल्याने याबाबत चौकशी करण्याची मागणी केलेली नाही.

(३) अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी कार्यक्षेत्रावर भेटी देऊन भूसंपादनाच्या अडचणी सोडविण्याबाबत प्रयत्न केलेले आहे व सरळ खरेदीने जुलै २०१८ पर्यंत खरेदी करून मोबदला देण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. भूसंपादन अभावी जमिन ताब्यात न आल्याने कालव्याचे काही ठिकाणी काम अपूर्ण राहिले आहे व त्यास कंत्राटदार जबाबदार नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) संयुक्त मोजणी मधील प्राप्त तक्रारीचे त्रुटी पूर्ततेमुळे विलंब झालेला आहे.

---

**भंडारदरा (जि.अहमदनगर) येथील महाराष्ट्र पर्यटन निवास महामंडळाच्या पर्यटन निवासाची झालेली दुरवस्था**

**(११) १०७१३९ (०७-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारदरा (जि.अहमदनगर) येथील महाराष्ट्र पर्यटन निवास महामंडळाच्या पर्यटन निवासाची दुरवस्था झाल्याने पावसाळयात निम्म्याहून अधिक कक्षामध्ये गळती (लिकेज) होत असल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पर्यटकांनी तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त पर्यटन निवासाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. बैठक-२०१७/१०/प्र.क्र. ९६७/पर्यटन, दि.६/२/२०१८ अन्वये भंडारदरा येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पर्यटक निवासाची श्रेणीवाढ करणे या कामासाठी रू.३६४.४८ लक्षच्या रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रू.१००.०० लक्ष निधी वितरीत केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू, जव्हार (जि.पालघर) या तालुक्यांचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्याबाबत**

**(१२) १०८३७५ (२८-०३-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू, जव्हार (जि.पालघर) या तालुक्यांचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्यासाठी तेथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) पालघर जिल्ह्यातील डहाणू व जव्हार तालुक्यातील विविध पर्यटनविषयक विकास कामांसाठी रू.५१५.६३ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

याशिवाय पालघर जिल्हा पर्यटन विकास बृहत आराखड्यामध्ये जव्हार व डहाणू या स्थळांचा समावेश असून अविभाजित ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीने ही ठिकाणे पर्यटन स्थळे म्हणून घोषित केलेली आहेत. जिल्हा नियोजन समिती,पालघर यांच्यामार्फत जिल्ह्याचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी पर्यटन विषयक सल्लागाराची नेमणूक केलेली आहे.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) तालुक्यातील पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासन पुरस्कृत ISBIG व DRIP-II अंतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(१३) १०८५२६ (१३-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) तालुक्यातील पूर्ण झालेल्या सुमारे १०० लघु पाटबंधारे योजनेवरील प्रकल्पांचे सिंचन मोडकळीस आले असल्याने त्यांच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासन पुरस्कृत ISBIG व DRIP-II अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मा. जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील (जि. बीड) पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासन पुरस्कृत ISBIG व DRIP-II अंतर्गत निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासन पुरस्कृत ISBIG योजनेअंतर्गत आष्टी,पाटोदा व शिरुर तालुक्यातील एकूण १३ प्रकल्प प्रस्तावित आहेत. ISBIG योजनांतर्गत प्रस्तावांना अद्याप केंद्र शासनाची मान्यता प्राप्त नाही.

तसेच DRIP-II योजनेअंतर्गत क्षेत्रिय कार्यालयाकडून आष्टी व पाटोदा तालुक्यातील ७ प्रकल्पांचे प्रस्ताव विहित मुदतीनंतर दुरुस्तीसाठी प्रस्तावित केले होते. त्यामुळे, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचेकडून शासनास प्राप्त प्रस्तावात सदर प्रकल्पांचा समावेश नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पळसदरी येथील धरणाची झालेली दुरवस्था**

**(१४) १०८५८५ (१३-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पळसदरी येथे सन १९१२ मध्ये रेल्वे प्रशासनामार्फत वाफेच्या इंजिनाला पाणी पुरविण्यासाठी धरण बांधण्यात आले होते व सन १९९० मध्ये वाफेचे इंजिन बंद केल्याने सदर धरणाच्या देखभालीकडे दुर्लक्ष करण्यात आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाच्या देखभालीच्या दुर्लक्षामुळे सदर धरणाच्या भिंतीला झाडेझुडपे वाढून धरणाला तडे गेले असल्याने धरण फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच सदर धरण बांधल्यापासून यातील गाळ न काढल्यामुळे धरणाच्या गाळात पर्यटक अडकल्याने त्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर धरणाच्या देखभाल व दुरूस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सदर धरण हे मध्य रेल्वेच्या व पर्यायाने केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. यातून रेल्वेचे वाफेचे इंजिन, रेल्वे स्टेशन तसेच रेल्वेच्या निवास स्थानांकरीताही पाणी देण्यात येत होते. वेळोवेळी सदर धरणाची देखभाल व दुरूस्ती केली जात असल्याचे तसेच सदर धरणाची स्थिती चांगली असल्याचे मध्य रेल्वेकडून कळविण्यात आले आहे. तसेच सदर धरणाची सन २००४ मध्ये दुरूस्ती करण्यात आल्याचे व सन २०१८ मध्ये पुन: दुरूस्ती करण्याचे नियोजित असल्याचेही मध्य रेल्वेकडून कळविण्यात आले आहे.

---

### समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून अहिल्यादेवी सिंचनविहीर वैयक्तीक लाभासाठी अल्पभूधारक शेतक-यांना प्रस्ताव दाखल करण्यास येत असलेल्या अडचणी

**(१५) १०९१४२ (२८-०३-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामीण रोहयोतंर्गत समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून अहिल्यादेवी सिंचनविहीर वैयक्तीक लाभासाठी अल्पभूधारक शेतक-यांना प्रस्ताव दाखल करताना ३८ प्रकारचे वेगवेगळे प्रमाणपत्र त्यात असणे बंधनकारक करण्यात आल्याने सिंचन विहीरीसाठी प्रस्ताव दाखल करणारे अल्पभूधारक लाभार्थी शेतकरी यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

लाभार्थ्याकडून आवश्यक असलेल्या काही प्रमाणपत्रांचीच मागणी करण्यात येते. ३८ प्रकारचे प्रमाणपत्राची मागणी करण्यात येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अभिनव भारत मंदिर स्मारकाचा जिर्णोधार व नूतनीकरण करणेबाबत**

**(१६) १०९२६० (०७-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वातंत्र पूर्व काळातील क्रांतीकारकांचे केद्र असणारे अभिनव भारत मंदिर स्मारकाचा जिर्णोधार व नूतनीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. पर्यटन मंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार अभिनव भारत मंदिर स्मारकाचा जिर्णोधार व नूतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) होय.

(२) नाशिक शहरासाठी पर्यटन विकास आराखडा तयार करण्याचे कार्य नाशिक महानगरपालिकेतर्फे सुरु असून सदर प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेकडे छाननी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अधिक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी, दक्षता पथक (नागपुर परीमंडळ) यांनी तांत्रिक परीक्षण विवरणाच्या माहितीसंबधी दिशाभूल केल्याबाबत**

**(१७) ११००९१ (१०-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधिक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी, दक्षता पथक (नागपुर परीमंडळ), जलसंपदा विभाग, नागपुर या कार्यालयाला स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे दिनांक ०८ जानेवारी,२०१८ रोजी त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयातर्फे करण्यात येणाऱ्या कामाचे तांत्रिक परीक्षण (Technical Audit Report) अहवालाची दिनांक ०१ जानेवारी, २०१२ ते ३० नोव्हेबर, २०१७ पर्यंत सविस्तर विवरणासह माहिती देण्यात यावी असे पत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर अधिक्षक अभियंता व परीमंडळीय अधिकारी, दक्षता पथक (नागपुर परीमंडळ), जलसंपदा विभाग, नागपुर यांनी दि. ०९/०१/२०१८ रोजी पत्र क्र. १२/ता.प. २०१८ नुसार स्थानिक लोकप्रतिनीधींना कार्यालयीन पत्र पाठवून करण्यात येणाऱ्या कामाचे तांत्रिक परीक्षण (Technical Audit Report) करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने माहे जुलै, २०१६ मध्ये घेतला आहे तथापि सदरहू तांत्रिक परीक्षणास आवश्यक प्रपत्रे कोणत्या स्वरूपाची असावी यासंबंधीचा विषय शासनाचे विचाराधीन असल्याचे व सबंधी प्रपत्रे निर्गमित झाल्यावर व सदर अहवालाची माहिती निरंक आहे असे पत्र देऊन उपरोक्त माहिती न देता सुचना केली व लोकप्रतिनिधीची दिशाभूल केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने तांत्रिक परीक्षण (Technical Audit Report) अहवालाची माहिती न दिल्यामुळे अप्राप्त आहे तसेच शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार यासंबंधी प्रपत्रे निर्गमित झालेले नाही त्यामुळे संबंधीत विभागाला तांत्रिक परीक्षण अहवाल तयार करण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०९-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक (नागपूर परीमंडळ), जलसंपदा विभाग, नागपूर यांनी ॲड. रामचंद्र पुनाजी अवसरे, विधान सभा सदस्य यांना दिनांक ०९/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जलसंपदा विभागाच्या विविध क्षेत्रिय कार्यालयातर्फे करण्यात येणाऱ्या कामाचे तांत्रिक परीक्षण करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने माहे जुलै, २०१६ मध्ये घेतला आहे. तथापी सदरहू तांत्रिक परीक्षणास आवश्यक प्रपत्रे कोणत्या स्वरुपाची असावी या संबंधीचा विषय शासनाचे विचाराधीन आहे. या संबंधी प्रपत्रे निर्गमीत झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

माात्र, माहे जानेवारी २०१२ ते ३० नोव्हेंबर, २०१७ या कालावधीतील तांत्रिक परिक्षण अहवालाची माहिती निरंक आहे असे कळविण्यांत आले होते.

तद्नंतर जलसंपदा विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या कामाचे तांत्रिक परिक्षण करण्यासाठी विहित करण्याची प्रपत्रे (विवरणपत्रे) शासन परिपत्रक दिनांक २१/५/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार स्थापत्य विभागाच्या कामांची तांत्रिक परिक्षणाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी क्षेत्रिय कार्यालयामार्फत सन्माननीय विधान सभा सदस्य यांना वस्तूस्थितीदर्शक माहिती देण्यात आली असून, त्यांना कोणतीही माहिती देण्यास टाळाटाळ वा दिशाभूल करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील**
**केवळ ४५ टक्के निधीच खर्च झाल्याबाबत**

**(१८) ११०७२७ (२८-०३-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाला राज्य शासनाने ५५ टक्के कात्री लावली असून, केवळ ४५ टक्के निधी माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहापर्यंत खर्च झाला असून मंजूर निधीही पडून असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, शेती, सामाजिक घटक, शैक्षणिक यासह सर्वच विभागाच्या संदर्भात मा.वित्त मंत्री यांनी मोठ्या घोषणा केलेल्या

असतानाही या घोषणांबाबतचा शासन निर्णयही संबधित विभागांनी अद्यापपर्यंत काढलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती  कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१८)** : (१) राज्याच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेला निधी वितरीत करताना मागील वर्षाच्या खर्चाचा कल, टप्प्या-टप्प्याने प्राप्त होणारी महसूली जमा व कर्ज, वितरीत निधीच्या झालेल्या खर्चाचा विनियोग तसेच वर्षभरात अचानक उद्भवणारा अनपेक्षित तातडीचा खर्च याबाबी विचारात घेऊन महसूली व भांडवली निधी वितरणाची मर्यादा वेळोवेळी निश्चित करण्यात येते. त्यानुसार जानेवारी, २०१८ अखेर आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, शेतकऱ्यासंदर्भातील योजना, मदत व पुनर्वसन इत्यादी बाबी वगळता महसूली खर्चाचा ७०%  व भांडवली खर्चाचा ८०% इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. डिसेंबर, २०१७ पर्यंतच्या पुरवणी मागण्यांसहीत सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु.३,५०,३९१ कोटी (निव्वळ) इतके होते. जानेवारी, २०१८ अखेर महालेखापाल कार्यालयाच्या मासिक वित्तीय लेख्यानुसार रु.१,९७,१५८ कोटी इतका खर्च झालेला असून त्या खर्चाची अर्थसंकल्पीत निधीशी टक्केवारी ५६% इतकी येते. तसेच मार्च, २०१८ च्या पुरवण्या मागण्यांसहीत सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु.३,५२,१८३ कोटी (निव्वळ) इतके होते. महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या मार्च, २०१८ च्या प्राथमिक अहवालानुसार रु.२,८५,७६२ कोटी इतका खर्च झालेला असून त्या खर्चाची अर्थसंकल्पित निधीशी टक्केवारी ८१% इतकी येते. राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये पर्जन्यमानाचा मोठा परिणाम होत असून बहुतांश योजनेचा आर्थिक वर्षाचा खर्च हा मोठया प्रमाणावर पावसाळा संपल्यानंतर व दुसऱ्या सहामाहीमध्ये होतो. केंद्र पुरस्कृत कार्यक्रमावरील खर्च हा अपेक्षित केंद्रीय निधी प्राप्त झाल्यावर तसेच योजनेची प्राथमिक तयारी व अपेक्षित मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुरु होतो. त्यामुळे मंजूर निधीही पडून आहे असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(२), (३), (४) व (५) सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील घोषणांच्या अनुषंगाने पणन उप विभागाच्या ४ घोषणा, तसेच पदुम व पर्यटन उप विभागांची प्रत्येकी एक घोषणा याप्रमाणे एकूण ६ घोषणा वगळता उर्वरित सर्व घोषणांबाबत आवश्यक बाबींच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, विकास आराखडयास मंजूरी, मा.मंत्रीमंडळाची मान्यता घेणे व आवश्यक शासन निर्णय निर्गमित करणे याबाबत आवश्यक कार्यवाही केली आहे. पणन उपविभागांतर्गतच्या घोषणांच्या अनुषंगाने कृषी पणन मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तर पदुम उप विभागाच्या घोषणेच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच पर्यटन उप विभागाच्या घोषणेच्या अनुषंगाने कार्यवाहीसाठी प्रस्ताव विभागाच्या विचारार्थ आहे.

___

**लातूर जिल्ह्यातील भोकरंबा चाडगाव सायगाव ते जिल्हा सरहद्द रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१९) १११११६३ (०५-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील भोकरंबा-चाडगाव-सायगाव ते जिल्हा सरहद्द हा लातूर व बीड जिल्ह्यास जोडणारा अत्यंत जवळचा रस्ता असून त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्याच्या कामास विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजुरी देण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतीनिधिनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव तातडीने विशेष बाब म्हणून सादर करण्याचे निर्देश मा.ग्रामविकास मंत्री महोदयांनी सचिव प्र.मं.ग्रा.सडक योजना आणि कार्यकारी अभियंता प्रधान मंत्री ग्रामसडक योजना लातूर यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्देशानुसार रस्त्याच्या कामास मंजुरी देवून तात्काळ रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मोरवड प्रजिमा ३ चाटेगांव ते जिल्हा सरहद्द ता.जि.लातुर या रस्त्याला विशेष बाब म्हणुन मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.), औरंगाबाद यांनी दि.१६.०५.२०१८ रोजी च्या पत्रान्वये शासनास सादर केला असुन त्याबाबत शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बामणी (जि.लातूर) येथील पूल बांधकाम मुख्यमंत्री ग्रामसडक योजना नाबार्ड अंतर्गत करण्याबाबत**

**(२०) १११११६४ (०५-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिवृष्टीमुळे वाहून गेलेला बामणी (जि.लातूर) येथील पुल बांधकाम मुख्यमंत्री ग्रामसडक योजना नाबार्ड अंतर्गत करण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतीनिधिनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार सदर कामास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पुलाच्या कामास शासनाची तत्वत: मंजुरी प्रदान करण्यात आली असुन सदर पुलाच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सादर करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयास सुचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे १,७२८ पदे मंजूर असतानाही ६४९ पदे रिक्त असल्याबाबत**

**(२१) १११८१७ (०५-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागासाठी १७२८ पदे मंजूर असून त्यापैंकी ६४९ पदे रिक्त असून आरोग्य विभागात सध्या अतिरिक्त कार्यभारामुळे रुग्णांचे दयनीय अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अ ते ड संवर्गातील संवर्गानिहाय किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत व सदर पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) सातारा जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य विभागासाठी एकूण १७२२ पदे मंजूर असून त्यापैकी १०३६ पदे भरलेली आहेत. उर्वरीत ६८६ पदे रिक्त आहेत. परंतु आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हयात आरोग्य सेवा उपलब्ध कर्मचा-यांव्दारे राबविण्यात येत आहे.
(२) जिल्हा परिषद सातारा येथे आरोग्य विभागांतर्गत माहे एप्रिल २०१८ ची मंजूर व रिक्त पदांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १५७ | ५२ |
| २ | औषध निर्माण अधिकारी | ८७ | ११ |
| ३ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ७ | ३ |
| ४ | कुष्ठरोग तंत्रज्ञ | ५ | ० |
| ५ | आरोग्य पर्यवेक्षक (पु.) | १८ | ३ |
| ६ | आरोग्य सहायक (पु.) | १३४ | ८ |
| ७ | आरोग्य सेवक (पु.) १० टक्के | ५१ | ३७ |
| ८ | आरोग्य सेवक (पु.) ४० टक्के | २०२ | १०५ |
| ९ | आरोग्य सेवक (पु.) ५० टक्के | २५३ | १५० |
| १० | आरोग्य सेवक (म.) | ६९६ | ३१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | आरोग्य सहाय्यक (म.) | १०६ | २ |
| १२ | आरोग्य पर्यवेक्षक (म.) | ६ | ० |
| एकूण | | १७२२ | ६८६ |

सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.१७/०१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेसाठी अतिरिक्त मनुष्यबळ मंजूर केलेले आहे. हे अतिरिक्त मंजूर केलेले मनुष्यबळ भरण्यास संचालक, आरोग्य सेवा यांनी दि.१७/०१/२०१६च्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे. त्यामुळे आरोग्य सेवक (म.) २२०, आरोग्य सेवक (पु.) १७५, प्रयोगशाळा तंत्रज्ञ २ पदे अशी अतिरिक्त पदे निर्माण झाल्याने रिक्त पदांमध्ये वाढ झालेली आहे.

जिल्हा परिषदेतील गट-क संवर्गातील पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाने दि.१३ जून,२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेमधील सर्व विभागातील सरळसेवेच्या कोटयातील गट-क संवर्गात रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखलदरा पंचायत समिती (जि.अमरावती) अंतर्गत दहेंद्री गट ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असलेल्या कोटमी गावामध्ये मनरेगाच्या कामात झालेली अनियमितता**

**(२२) १११८६४ (२८-०३-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा पंचायत समिती (जि.अमरावती) अंतर्गत दहेंद्री गट ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असलेल्या कोटमी गावामध्ये मनरेगाच्या कामामध्ये अनियमितता झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तक्रार दाखल करण्यात आली असून चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीत नमूद हजेरी पत्रकाची पडताळणी होऊन त्यात ग्रामरोजगार सेवक हे दोषी असल्याचे आढळून आले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चिखलदरा यांचे अहवालावरुन सदर ग्रामरोजगार सेवकाला पदावरुन कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मौजे वांझोळे स्टॉप ते गावकरवाडी ग्रामदेवता मंदिरपर्यंतच्या रस्त्याचे काम करण्याबाबत**

**(२३) ११२२३४ (०७-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मौजे वांझोळे स्टॉप ते गावकरवाडी ग्रामदेवता मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबतची विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास मा. रोजगार हमी मंत्री यांचेकडे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु रस्त्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आराखड्यात अद्यापही समाविष्ट करण्यात आलेले नसून रस्त्याच्या कामास जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचेकडुन अद्यापही मंजूर झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आराखड्यात समाविष्ट करुन रस्त्याचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये अशा प्रकारची मागणी केलेली दिसून येत नाही. तथापि, मा.मंत्री (रोहयो) यांनी दिलेल्या निर्देशानुसार ग्रामपंचायतीने सदरचे काम सन २०१७-१८ च्या पुरक आराखडयात समाविष्ट केलेले आहे.

(२) सदरचे काम ग्रामपंचायतीच्या/पंचायत समितीच्या आराखडयात नसल्याने त्यास मंजुरी देता आलेली नाही.

(३) मा.मंत्री महोदय यांच्या दिनांक १७/०२/२०१८ च्या पत्रान्वये ग्रामसभेने सदरचे काम ग्रामसभेच्या आराखडयात घेतले असून मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबड (जि.जालना) तालुक्यातील वडीगोद्री गावातील नागरिकांना शौचालयाचे अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(२४) ११२३०४ (०७-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) तालुक्यातील वडीगोद्री गावातील नागरिकांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रमीण रोजगार हमी योजनेंतर्गत मागील तीन महिन्याअखेरपर्यंत शौचालयाचे बांधकाम स्वखर्चाने पूर्ण केले यामध्ये एकूण १८१ शौचालय बांधकाम झाले असून त्यापैकी फक्त १८ शौचालयाचे अनुदान मिळाले तसेच उर्वरित १६३ शौचालयांचे अनुदान अद्यापपर्यंत मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील नागरिकांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन सुध्दा शौचालयाचे अनुदान देण्यास टाळाटाळ होत असल्याने त्यांनी शौचालयाच्या बांधकामासाठी घेतलेल्या उसनवारीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार शौचालयाच्या अनुदानास विलंब करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वडीगोद्री ग्रामपंचायतीमध्ये मोठया प्रमाणावर शौचालयाची कामे सुरु होती. त्यामध्ये जे लाभार्थी बेसलाईन सर्व्हेमध्ये होते त्यांना स्वच्छ भारत मिशनमधून अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. ज्या लाभार्थ्यांची नावे बेसलाईनमध्ये नव्हती त्यांनी नरेगा अंतर्गत प्रस्ताव दाखल करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार १३० वैयक्तिक शौचालयाच्या कामास मान्यता देण्यात आली होती.
(२) ग्रामपंचायत, वडीगोद्री, ता.अंबड, जि.जालना अंतर्गत १३० वैयक्तिक शौचालय कामास प्रशासकीय मान्यता दिलेली असून त्यापैकी ४१ लाभार्थ्यांच्या हजेरीपत्रकाची मागणी केली असता त्यापैकी पात्र असणा-या १८ शौचालय लाभार्थ्यांस हजेरीपत्रक वितरीत करण्यात आलेले होते व त्यांचे अकुशल देयक अदा करण्यात आलेले आहे. उर्वरित २३ लाभार्थ्यांचे हजेरीपत्रक मागणीचा प्रस्ताव त्रुटी असल्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींना परत करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय मान्यता दिलेल्या १३० लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम पुर्ण केलेले आहे, परंतु दि.१ नोव्हेंबर, २०१७ पासून नरेगा कामास काम सुरु करण्यापुर्वी GEO Tagging सुरु झाल्यामुळे व लाभार्थ्यींनी काम त्यापूर्वीच पुर्ण केले असल्यामुळे GEO Tagging करता येत नाही. त्यामुळे उर्वरित ११२ लाभार्थ्यींचे हजेरीपत्रक वितरीत करता आले नाही व सदर लाभार्थीस अनुदान वितरीत करण्यात आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या अर्थसंकल्पातील निधीपैकी सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा, गृहनिर्माण, पर्यावरण, पाणीपुरवठा या विभागांनी दहा टक्के निधी देखील खर्च केलेला नसल्याबाबत

**(२५) ११३६८४ (२८-०३-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत वर्षीच्या अर्थसंकल्पातून शासनाने विविध विभागांना विकासकामे करण्यासाठी मंजूर केलेल्या निधीपैकी फक्त ३८ टक्केच निधी खर्च झाला तसेच आर्थिक वर्ष संपण्यास केवळ दोन महिने राहिले असताना राज्याच्या अर्थसंकल्पातील निधीपैकी सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, अन्न व नागरी पुरवठा, गृहनिर्माण, पर्यावरण, पाणीपुरवठा व आदिवासी विकास या

विभागाने दहा टक्के निधी देखील खर्च केलेला नसल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्याचे एकूण अर्थसंकल्पीय अंदाज ३,६९,१८५.३१३ कोटी रुपयांचे होते, त्यापैकी २,२७,१०२.८५५ कोटी रुपये वित्त विभागाने त्या त्या विभागांना वर्ग केले, मात्र त्यापैकी फक्त १,४०,६३९.८८ कोटी रुपये खर्च झाले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आर्थिक वर्षासाठी विकासकामे व योजना पूर्ण करण्यासाठी वित्त विभागाकडून विभागांना देण्यात येणा-या निधीचा पूर्ण विनियोग न करणा-या विभागांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महसूली जमा व उभारण्यात येणारे कर्ज हे टप्प्या-टप्प्याने प्राप्त होत असल्याने प्रशासकीय विभागांना अर्थसंकल्प अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) मासिक निधी विवरणपत्र तयार करुन निधी उपलब्ध करणे ही प्रचलित पध्दत आहे. त्यानुषंगाने प्रशासकीय विभागांना माहे जानेवारी-२०१८ पर्यंत महसूली खर्चाच्या ७०% व भांडवली खर्चाच्या ८०% एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

डिसेंबर-२०१७ पर्यंतच्या पुरवण्या मागण्यांसहित सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु.३,५०,३९१ कोटी (निव्वळ) इतके आहेत. जानेवारी-२०१८ अखेर महालेखापाल कार्यालयाच्या मासिक वित्तिय लेख्यामध्ये रु. १,९७,१५८ कोटी इतका खर्च झालेला असून त्या खर्चाची अर्थसंकल्पीत निधीशी टक्केवारी ५६% इतकी येते.

सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग या विभागांना उपलब्ध करुन दिलेला निधी त्यांच्या अखत्यारीतील अधिकारी, महामंडळ, इत्यादीच्या स्वीय प्रपंची खात्यामधून होत असल्याने व हा खर्च कोषागारामधून होत नसल्याने सदर खर्चाची नोंद अर्थसंकल्प वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) होत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग (Hybrid Annuity वगळून), जलसंपदा विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग या विभागांना वितरीत केलेल्या तरतूदीपैकी अनुक्रमे ६८%, ७६% व ७८% इतका खर्च झालेला आहे. पाणी पुरवठा विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यावरण विभाग व गृहनिर्माण विभागाकडे मोठ्या प्रमाणावर केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी अर्थसंकल्पीत असून अपेक्षित केंद्रीय निधी न मिळाल्याने तो व समरुप राज्य हिस्सा खर्च झाला नाही. त्यामुळे या विभागांचा खर्च कमी दिसत आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये पर्जन्यमानाचा मोठा वाटा असून पावसाळा संपल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे राज्यामध्ये माहे ऑक्टोबर ते माहे मे या कालावधीमध्ये खर्च करण्याचा कल दिसून येतो. त्यामुळे अर्थसंकल्पीत निधीपैकी वेतन, निवृत्तीवेतन, व्याज व कर्जाची परतफेड याव्यतिरिक्त होणारा खर्च हा वित्तीय वर्षाच्या शेवटच्या ३ महिन्यात मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो.

प्रशासकीय विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे व दर तीन महिन्यांनी सचिवस्तरावर आढावा घ्यावा तसेच वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रमाणाबाहेर खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीचा लाभ शहरी शेतकऱ्यानां मिळणेबाबत**

**(२६) ११५०८१ (०६-०४-२०१८). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीचा लाभ केवळ ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यानांच मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी भागातही अनेक शेतकरी पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असल्याने त्यांना जॉब कार्ड मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात राहून ग्रामीण भागात २५ ते ५० कि.मी. वाहनाने जाऊन शेती करणे शक्य असल्यामुळे शहरी भागातील ग्रामीण भागात शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनाही समाविष्ट करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीच्या निकषात बदल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

दि. १७ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीचा लाभ घेणारा लाभार्थी हा जॉबकार्ड धारक असला पाहिजे तसेच, त्याने मजूर म्हणून काम करुन मजूरी घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार कोणत्याही ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या आणि अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यास तयार असणारी प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्ती ही जॉबकार्ड साठी पात्र असल्यामुळे शहरी भागात वास्तव्यास असलेल्या व ग्रामीण भागात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जॉबकार्ड देता येत नाही. त्यामुळे जॉबकार्ड अभावी अशा शेतकऱ्यांना वैयक्तिक सिंचन विहिरीचा लाभ देता येत नाही. तसेच, सदर तरतुद ही केंद्र शासनाची असल्यामुळे त्यात राज्यस्तरावर बदल करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वित्त विभागांतर्गत येणाऱ्या लेखाधिकारी आणि सहाय्यक लेखाधिकारी पदावर पात्र कर्मचा-यांना नियुक्ती दिली नसल्याबाबत**

**(२७) ११६६०७ (२३-०७-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वित्त विभागांतर्गत येणाऱ्या लेखाधिकारी आणि सहाय्यक लेखाधिका-यांची मोठ्या संख्येने पदे रिक्त असल्याने या पदाच्या नियुक्तीबाबत विविध विभागातील कर्मचाऱ्यांची माहे मे २०१६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (एम.पी.एस.सी) परीक्षा घेण्यात आली असून या परीक्षेत एकूण ३०२ कर्मचारी पास झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उत्तीर्ण कर्मचा-यांपैकी काहींना २ वर्षानंतर शासनाने नियुक्त केले असले तरीही अद्यापि ११६ पात्र कर्मचा-यांना नियुक्त केले नसल्याने सदर कर्मचारी नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत तर दुसरीकडे आजही राज्यातील विभागांतर्गत येणाऱ्या लेखाधिकारी आणि सहाय्यक लेखाधिकारी पदाची एकुण ५१९ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे माहे मे २०१५ मध्ये घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या मात्र अद्यापि नियुक्ती न दिलेल्यांना या रिक्त पदावर नियुक्त न करण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(४) असल्यास, सदरहू नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्र ११६ कर्मचा-यांना त्वरित नियुक्ती देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१८) :** (१) नाही. तथापि मे-२०१५ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे “महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ परीक्षा, सहाय्यक लेखा अधिकारी” घेण्यात आली होती. सदर परीक्षेत एकूण २७९ कर्मचारी उत्तीर्ण झाले आहेत.

(२) अंशतः खरे आहे. अद्यापी १२२ कर्मचारी नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. सद्य:स्थितीत सहायक लेखा अधिकारी व लेखा अधिकारी संवर्गात अनुक्रमे २०९ व १६० अशी एकूण ३६९ पदे रिक्त आहेत.

(३) व (४) सहायक लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. सुवर्णा संत व इतर यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दावा दाखल केला आहे. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने सदर दाव्याचा निर्णय शासनाच्या विरोधात पारीत केला आहे. सदर निर्णयाच्या विरोधात शासनाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन दाखल केली असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. त्यामूळे नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती देता येणे शक्य झाले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**विविध विभागांना दिलेल्या विकास निधीच्या विनियोगतेच्या तपशिलाची पडताळणी केली नसल्याबाबत**

**(२८) ११७०४१ (२०-०७-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने विविध विभागांना दिलेल्या तब्बल ६० हजार कोटी रूपयांच्या विकास निधीचा कशाप्रकारे विनियोग झाला याची पडताळणी केली नसल्याचा ठपका कॅगने त्यांच्या अहवालात ठेवला असून विशेष म्हणजे ज्या खात्यांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य सरकारने या निधीच्या वापराबाबत जबाबदार धरले नसल्याचेही अहवालात नमुद केले असल्याची बाब दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विभागाकडून डिसेंबर, २०१७ पर्यंत ३८,८८४ कोटी रुपयाच्या निधी वापराची प्रमाणपत्रे शासनाकडे जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ज्या विभागांनी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी निधी विनियोगतेचा तपशिल व हिशोब दिलेला नाही त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. प्रशासकीय विभाग व स्वायत्त संस्था / वाणिज्य उपक्रम यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेवर सादर केली जात नसल्याची बाब कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवालानुसार (दि.३१.३.२०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल) सन २०१६-१७ अखेरीस रू.६०,३२१.७८ कोटी रक्कमेची ३८,८८४ एवढी उपयोगिता प्रमाणपत्रे विविध विभागांकडे प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास विहित कालावधीत सादर करण्याच्या व प्रलंबितता कमी करण्याच्या सूचना वित्त विभागामार्फत वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर प्रमाणपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास संबंधितांविरूद्ध करावयाच्या कार्यवाहीबाबत देखील प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे धरण बांधण्याबाबत**

**(२९) ११७०६३ (२४-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढाकमोली (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पंचक्रोशीत पाणीपुरवठा करण्यासाठी ढाकमोली येथे धरण बांधण्याबाबत सन २००६ ते २००९ या कालावधीत सर्व्हे करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व्हे केल्यानंतर सदर धरणाचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) होय.
(२) सदर योजनेचे सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यावर प्रकल्पाचे अंदाजपत्रक माहे एप्रिल, २००७ मध्ये क्षेत्रीय कार्यालयास सादर करण्यात आले होते.

तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या दिनांक ५.८.२०१० रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार रत्नागिरी जिल्हयात सिंचनाचा अनुशेष असला तरी जिल्हयात त्यावेळी प्रगतीपथावर असलेल्या योजनामधून सिंचनाचा अनुशेष भरून येणार असल्याने रत्नागिरी जिल्हयात नविन सिंचन प्रकल्पाची आवश्यकता नाही, असे कळविले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भ आणि मराठवाड्यातील जलसिंचन प्रकल्पांसाठी निधी मिळण्याबाबत

**(३०) ११७२६४ (२०-०७-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ आणि मराठवाड्यातील जलसिंचन प्रकल्पांसाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला ४ हजार कोटीची विशेष आर्थिक मदत दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा व विदर्भातील जलसिंचन प्रकल्पांच्या विकासासाठी १४ हजार कोटीची आवश्यकता असल्याने उर्वरित १० हजार कोटी रुपयांची तरतूद शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडा व विदर्भातील लघु जलसिंचन प्रकल्पांचा विकास या उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-१०-२०१८) :** (१) विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील एकूण ९१ सिंचन प्रकल्प पूर्ण करणेसाठी विशेष पॅकेजच्या स्वरुपात रु.३८३१.४२ कोटीचे केंद्रीय अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास केंद्र शासनाने दि.३० जुलै, २०१८ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

(२) व (३) सदर ९१ पाटबंधारे प्रकल्पांची दि.०१ एप्रिल, २०१८ ची उर्वरित किंमत रु.१३६५१.६१ कोटी इतकी आहे. केंद्रीय अर्थसहाय्य वगळता उर्वरित किंमतीसाठी राज्य हिस्सा म्हणून नाबार्डकडून कर्ज प्राप्त होणार आहे. यासाठी नाबार्डला राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील गोदावरी नदीवर कार्यान्वित १३ उपसा जलसिंचन योजना बंद झाल्याबाबत**
**(३१) ११७९०३ (२०-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील गोदावरी नदीवर कार्यान्वित १३ उपसा जलसिंचन योजना बंद झाले असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनांसाठी वापरात येणारे किमान ७४ दलघमी पाणी शेजारील तेलंगणा राज्यात जात असुन वाढत्या उष्णतेमुळे जलसाठयात झपाटयाने घट होत असल्याने नांदेड जिल्हयात केवळ ३७ टक्के जलसाठा राहिला असल्याने नागरिकांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बंद झालेल्या उपसा जलसिंचन योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) होय.
(२) सदर बंद योजनांचा पाणी वापर विचारात घेऊनच जवळपास त्याच पाणीवापरा एवढा (७७.६० दलघमी) बाभळी बंधारा गोदावरी नदीवर बांधण्यात आला असुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर मर्यादेत लाभार्थ्यांना पाणीसाठा वापरासाठी उपलब्ध करण्यात येत आहे.
(३) बाभळी बंधारा बांधण्यात आल्यामुळे व बंद उपसा सिंचन योजनांसाठीचा पाणीवापर या बंधा-यातून वैयक्तीक उपसा सिंचनाद्वारे करणे, अपेक्षित असल्यामुळे या योजना पुर्नस्थापित करण्याचा प्रस्ताव सद्यःस्थितीत विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) येथील सुधा प्रकल्पाचे दोन्ही कालवे नादुरुस्त असल्याबाबत**
**(३२) ११७९७३ (२०-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथील सुधा प्रकल्पाचे दोन्ही कालवे नादुरुस्त असल्यामुळे आसपासच्या परिसरातील चार गावातील शेतीचे पाण्याअभावी नुकसान होत असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाला दोन कालवे जोडण्यात आले होते या कालव्यावरुन रेणापूर, कोळगाव खु, कोळगाव ब्रु,गारगोटवाडी (दि), नांदा खु या गावातील शेतीला पाणी मिळणे गरजेचे होते या प्रकल्पाला जोडणारे दोन्ही कालवे नादुरुस्त असल्याने कोळगांव खु, कोळगाव ब्रु,गारगोटवाडी (दि) नांदा खु या गावातील शेती सिंचनापासून वंचित राहत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) होय, खरे आहे.
(२) प्रकल्पाचे दोन्ही कालवे डोंगर पायथ्यालगत जात असून डोंगरावरुन येणा-या पावसाच्या पाण्यामुळे कालव्याचे काही ठिकाणी फुटून नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रश्नात नमूद गावांना कालव्याद्वारे शेतीसाठी पाणी देता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) याबाबत अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.२ व कार्यकारी अभियंता नांदेड पाटबंधारे विभाग (उत्तर) नांदेड यांचे समवेत सविस्तर पाहणी (वॉक थ्रू सर्व्हे) करुन कालव्यातून पाणी जाण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य लॉटरी सोडतीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्थायी नियुक्ति करण्याबाबत**

**(३३) ११८१४० (२०-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य लॉटरी सोडतीचे काम करणारे व १७ वर्षे कार्यरत असणाऱ्या २० कर्मचाऱ्यांची अद्यापपर्यंत शासन सेवेत स्थायी नियुक्ति केली नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांची शासन सेवेत स्थायी नियुक्ति करण्याचे आदेश मॅटने दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मॅटच्या आदेशान्वये सदरहू कर्मचाऱ्यांची स्थायी नियुक्ति करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही,

(२) होय, हे खरे आहे,

(३) व (४) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.२२/०१/२०१६ रोजी सदर कर्मचाऱ्यांच्या स्थायी नियुक्तीबाबत सहा आठवडयाच्या मुदतीत विचार करावा असे निर्देश दिले होते. परंतु सदर मुदतवाढीसाठी शासनाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अर्ज दाखल केला. सदर अर्ज मा. न्यायालयाने फेटाळल्यामुळे मा. उच्च न्यायालयामध्ये दि.१६/०४/२०१६ रोजी रिट याचिका दाखल करण्यात आली. याबाबत मा. उच्च न्यायालयाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दि. २२/०१/२०१६ रोजीच्या आदेशास मा.उच्च न्यायालयाने दि २७/०४/२०१६ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असून अंतिम निर्णय होईपर्यंत मा. उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करू नये, असा निर्णय दिला आहे.

---

## भोर (जि.पुणे) येथील नीरा नदीचे पाणी शेती व पिण्यासाठी मिळण्याकरिता बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३४) ११९१६४ (२४-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील नीरा नदीचे पाणी शेती व पिण्यासाठी मिळण्याकरिता बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधारे बांधले परंतु सदरील बंधा-याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने बंधारे निखळले असून त्याची दुरवस्था झाली असल्याने पाणी थांबतच नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पाटबंधारे विभाग दुर्लक्ष करीत असून या बंधा-याची त्वरीत दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त बंधा-यांची तपासणी करुन सदरील बंधा-याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे
(२) स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या बंधाऱ्याची त्वरीत दुरूस्ती करण्याबाबत मागणी होत आहे.
(३) उपरोक्त बंधाऱ्याच्या दुरूस्तीची अंदाजपत्रके क्षेत्रिय स्तरावर तयार केली असून विशेष दुरूस्ती अंतर्गत मान्यता घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हा कोषागार कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) ११९२३८ (२०-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हा कोषागार कार्यालयाकडे जिल्हयातील सर्व शासकीय निमशासकीय, शिष्यवृत्तीसह मोठ्या प्रमाणात देयके बनवून व अदा करणे बाबतची अनेक कामे रिक्त पदांमुळे प्रलंबित असल्याची बाब दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा कोषागारात ९२ पदे मंजूर असतांना फक्त ३६ कर्मचा-यांवरच कोषागाराचा कारभार चालत असल्याने रिक्त पदांमुळे वेतन, निवृत्ती धारकांचे पेन्शन, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तथा इतर शासकीय देणी वेळेवर दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जिल्हा कोषागारातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. जिल्हा कोषागारात ९२ मंजूर पदे आहेत. त्यापैकी ५५ पदे भरलेली असून ३७ रिक्त पदे आहेत. सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांकडून कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.
(३) रिक्त पदे बाह्ययंत्रणेव्दारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच शासन निर्णय दि.१६ मे, २०१८ नुसार रिक्त पदे भरण्याबाबतही उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात मागेल त्याला शेततळे योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३६) ११९४१२ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात मागेल त्याला शेततळे या योजनेकडे शेतक-यांनी पाठ फिरविल्याने या योजनेचे लक्षांक पूर्ण करण्यासाठी काही वरिष्ठ अधिका-यांचा गोपनीय अहवाल या योजनेच्या यशस्वीतेवर अवलंबून असल्याने या योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

"मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्हयास ५,००० शेततळ्यांचा लक्षांक देण्यात आलेला आहे. माहे जुलै,२०१८ च्या अखेरीस ६,९६५ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून ४,६४८ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच ३५२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्या-साक्या प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची वितरिका क्रमांक-१ दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) १२०७०७ (२०-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग मालेगांव (जि.नाशिक) या विभागाने नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्या-साक्या प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची वितरिका क्रमांक-१ दुरुस्तीसाठीचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरी देवून निधीची तरतूद करण्याबाबत कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रस्ताव त्रुटीपूर्ततेनंतर महामंडळामार्फत शासनास सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतंर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील अनेक कुशल व अकुशल कामागारांची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) १२१११४ (२३-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतंर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील अनेक कुशल व अकुशल कामागारांची देयके प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू कामगारांची देयके तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-१०-२०१८) :** (१) होय.

अंशत: खरे आहे.

(२) व (३) निधी अभावी मग्रारोहयो अंतर्गत बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील कुशल व अकुशल मजुरांची देयके काही प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. यास्तव शासनाने जून, २०१८ मध्ये निधी उपलब्ध करून दिला. निधी मिळाल्यानंतर त्याच दिवशी मजुरांची देयके अदा करण्यात आलेली असल्याने सद्यस्थितीत मजुरांची देयके अदा करणे प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात शेतकरी व शेतमजूरांना रोहयो अंतर्गत रोजगार देण्याबाबत**

**(३९) १२२३९२ (२३-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे सुरु नसल्याने शेतमजूर बेरोजगार झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतमजूरांना रोजगार देण्यासाठी रोहयोची कामे तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

फुलंब्री तालुक्यात मे, २०१८ एकुण ३२४ कामे सुरु होती. त्याकामावर ११७१० मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याव्दारे ६२७०७ ऐवढी मनुष्यदिन निर्मिती झालेली आहे.

(२) मग्रारोहयो ही मागणी प्रवण योजना आहे. या अंतर्गत मजुरांनी केलेल्या मागणी प्रमाणे व कुशल स्वरुपाची कामे उपलब्ध करुन देणे व ग्रामीण भागात स्थायी स्वरुपांचे दर्जेदार व टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे, हा या कामाचा उद्देश आहे. त्यानुसार या कार्यक्रमातंर्गत कामांचे व खर्चाचे नियोजन करण्यात आले असुन फुलंब्री तालुक्यात माहे मे २०१८ या महिन्यात विविध स्वरुपाची एकुण ९३९ कामे सेल्फवर उपलब्ध करून घेण्यात आली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शाळेच्या वसतीगृहातील संचालकांच्या संगनमताने संस्था चालक खोटी वसतीगृह दाखवून निधी घेत असल्याबाबत**

**(४०) १२२४२१ (२०-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग कल्याण महाराष्ट राज्य, पुणे विभाग यांचे मार्फत प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळा असून कित्येक शाळांच्या वसतीगृहातील संचालकांच्या संगनमताने संस्था चालक खोटी वसतीगृह दाखवून शासनाचा निधी घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शाळांसाठी वसतीगृहे बांधण्यासह खोटी वसतीगृहे दाखवून निधी घेणाऱ्या वसतीगृहातील संचालक व संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०८-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील खडखड डोमिहीरा धरणातून होत असलेली गळती**

**(४१) १२२६१५ (२०-०७-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील खडखड डोमिहीरा धरण जागोजागी पाझरत असल्याने त्यावर खर्च झालेले ७३ कोटी वाया गेले असून सहा वर्षापूर्वी बांधलेल्या या धरणावर आतापर्यंत १३२ कोटीं खर्च करुनही गळती थांबत नसल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

डोमिहिरा धरणावर आतापर्यंत ९८.३२ कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २०११ पासून सांडव्यातून गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तज्ञ समितीने सुचविल्यानुसार सांडवा व पक्ष भिंतीतून होणा-या गळतीवर गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) होय.

दिनांक ८/३/२०११ अन्वये डोमिहीरा धरणातील गळती संबंधी चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या अहवालानुसार, संबंधित ठेकेदारांवर व अधिका-यांवर दोषारोप निश्चित करून त्याबाबतची चौकशी प्रादेशिक विशेष चौकशी अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई यांचेमार्फत सुरू आहे.

(३) सदर कामास जबाबदार असणा-या ठेकेदारावर आर्थिक दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दक्षिण सोलापूर सीना नदीचा बंधारा दुरुस्त करण्याबाबत

**(४२) १२२९२० (२०-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर सीना नदीला दिड वर्षापूर्वी आलेल्या पुरामध्ये बंधारा फुटला, या बंधा-याच्या दुरुस्तीची मागणी सतत करुनही दखल घेण्यात न आल्याने शेतक-यांनी नदी पात्रात आंदोलन केल्यामुळे निधी उपलब्ध करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाच्या भुमीपुजनासाठी आलेल्या सहकारमंत्री यांना स्थानिक शेतक-यांनी दिनांक १३ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करुन विरोध केला , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

दि.०१.०१.२०१६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सीना नदीस पूर आला होता. त्याचवेळी उस्मानाबाद जिल्ह्यात सीना नदीवर असणाऱ्या सीना कोळेगाव धरणातून सुमारे ६० हजार ते ६५ हजार क्यूसेक्स इतका विसर्ग सीना नदीत सोडण्यात आला होता. तो नदीपात्राबाहेर पसरल्याने बंदलगी को.प.बंधाऱ्याचा काही भाग वाहून गेला.

(२) या कामाचे भूमीपूजन मा.सहकार मंत्री यांच्या हस्ते शनिवार दि.१२ मे २०१८ रोजी झाले व तेथे काही स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला होता.

(३) बंदलगी को.प.बंधारा दुरूस्ती कामाचे कार्यारंभ आदेश दि.१६/०५/२०१८ रोजी देण्यात आले असून सध्या विशेष दुरूस्तीचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मजरे कार्वे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील वापराविना पडून असलेल्या पाटबंधारे कॉलनीबाबत**

**(४३) १२३०४३ (२०-०७-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मजरे कार्वे (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे ३० वर्षापूर्वी मुरकुटेवाडी रस्त्यावर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना राहण्यासाठी कॉलनी बांधण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर कॉलनीतील निवासस्थाने गेल्या अनेक वर्षापासून रिकामी असल्याने त्याचा वापर पर्यटक लोक अवैध वापरासाठी करीत असल्याने तसेच त्याठिकाणी यापूर्वी सुरु करण्यात आलेले रेसिंडेसियल स्कूल आता बंद पडल्याने सदर इमारती आता विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कॉलनीतील निवासस्थाने शासकीय कार्यालयासाठी वापरात आणण्याच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाला विनंती केली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) अशंतः खरे आहे.

जंगमहट्टी मध्यम प्रकल्पाचे काम सन २००४ मध्ये पूर्ण झालेनंतर तेथील कार्यालय व कर्मचारी इतरत्र हालविल्यामुळे सदर वसाहतीतील इमारती मोकळया होत्या सदर रिकाम्या इमारती भाडे तत्वावर मिळण्याबाबत नरसिंगराव गुरुनाथ पाटील, पब्लिक चॅरोटेबल ट्रस्ट, हलकर्णी ता.चंदगड या सस्थेने मागणी केली होती. त्यानुसार महामंडळाकडून दि. ६/८/२००४

च्या पत्रान्वये संस्थेसोबत रितसर करारनामा करुन सदर इमारत भाडेतत्वावर दिली आहे. सध्या सदरच्या इमारती संस्थेच्या ताब्यात आहेत.

(३) व (४) होय, सदर पत्राच्या अनुषंगाने नरसिंगराव गुरुनाथ पाटील पब्लिक चॅरोटेबल ट्रस्ट, हलकर्णी ता. चंदगड या संस्थेच्या ताब्यात असलेली इमारती परत घेऊन त्या इतर विभागांना आवश्यक आहेत किंवा कसे, याची पडताडणी करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील रोहयो अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत**

**(४४) १२३१११ (२३-०७-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रोहयो अंतर्गत कंत्राटी कर्मचारी यांची पदे आवश्यक असताना सुद्धा कमी करण्यात येत आहेत तसेच रोहयोच्या कंत्राटी कर्मचारी यांना इतर योजनेतील कर्मचारी पेक्षा मानधन कमी देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) तसेच भविष्यनिर्वाह निधीबाबत केंद्र शासनाचे आदेश असताना देखील राज्यात त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही व कंत्राटी कर्मचारी यांची कोणत्याही प्रकारची चौकशी न करता त्यांना कामावरून कमी करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोहयो अंतर्गत कंत्राटी कर्मचारी यांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) भविष्यनिर्वाह निधीबाबत केंद्र सरकारच्या सूचना आहेत. तथापि, राज्यामध्ये कंत्राटी मनुष्यबळ बाहयस्थ संस्थेमार्फत नियुक्त होत असल्यामुळे याबाबत निर्णय झालेला नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणी आधारीत असल्याने प्रतिवर्षी निर्मित होणाऱ्या मनुष्यदिनाच्या प्रमाणात आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्यात येते. त्यामुळे कंत्राटी कर्मचारी यांना कामावरुन कमी करण्यात येते अशी बाब नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकवासला जुना मुळा मुठा उजवा कालव्याचे अस्तरीकरण व पुलांची उंची वाढविण्याबाबत**

**(४५) १२३८४५ (२४-०७-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला जुना मुळा मुठा उजवा कालवा (बेबी कालवा) यातुन दिनांक २८ मे,२०१८ रोजी उन्हाळी आवर्तनाच्या वेळी कालव्याच्या पाणी गळतीमुळे हवेली तालुक्यातील सोरतापवाडी, कुंजीरवाडी व लोणी काळभोर येथील रस्त्याचे व शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्यातुन आर्वतन सोडण्यापुर्वी कालव्यावरिल सर्व पुलांची उंची वाढविणे, तसेच लोकवस्तीच्या ठिकाणी कालव्याचे अस्तरिकरण करण्याची मागणी ग्रामस्थानी करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यातुन वाहणाऱ्या अशुध्द पाण्यामुळे अनेक ठिकाणचे पिण्याच्या पाण्याचे नैसर्गिक स्रोत खराब झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कालव्याचे अस्तरीकरण करुन पुलांची उंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) खरे आहे.

(४) जुना मुठा उजवा कालव्यावरील पूर्ण झालेल्या व प्रगतीत असलेल्या पुलांची उंची योग्य पातळीवर ठेवण्यात आलेली आहे.

गळतीचे ठिकाणी व आवश्यक त्या ठिकाणी कालवा अस्तरीकरण बिगर सिंचन पाणीपट्टीच्या ४०% उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिलहयातील सावनेर तालुक्यातील आठ गावांना उमरी मध्यम प्रकल्पाव्दारे सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४६) १२४०९५ (२४-०७-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील उमरी मध्यम प्रकल्पातंर्गत सिंचनाला सुरुवात झाली असतांनाही सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील आठ गावे सिंचनापासून वचिंत असल्यामुळे उमरी प्रकल्पातंर्गत खापा लघु कालव्याचे विस्तार व सुधारणा करून सदर आठ गावांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी व त्यानंतर वारंवार निवेदन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सावनेर तालुक्यातील आठ गावांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यासाठीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी देण्यासह उमरी प्रकल्पातंर्गत

खापा लघु कालव्याचे विस्तार व सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१)होय, हे खरे आहे.
(२) उमरी मध्यम प्रकल्पांतर्गतच्या खापा लघु कालव्याचा विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित रु.७२.८७ लक्ष किंमतीचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.३१.०८.२०१८ नुसार शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुरुदेव नगर, मोझरी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील दासटेकडी येथील विकास आराखडयाबाबत**

**(४७) १२४५३२ (२०-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुरुदेव नगर, मोझरी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील दासटेकडी येथे तयार झालेल्या इमारतीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रशिक्षण व संशोधन संस्थाचा प्रस्ताव संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती यांचेकडून प्राप्त झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोझरी विकास आराखडयांतर्गत मंजुर रु.१५०.८३ कोटीच्या आराखडयामधून दासटेकडी परिसरात शासकीय जमिनी २५ एकर व संस्थेची जमीन १६ एकर यामध्ये शैक्षणिक संकुलाचे बांधकाम, भक्त निवासाचे बांधकाम, ग्रामविकास प्रबोधिनी, विशेष अतिथीगृहाचे बांधकाम, दासटेकडी परिसरातील कॉक्रीट रोड व नाली बांधकाम, सरंक्षण भिंतीची काम अशी एकंदर २९.१९ कोटीची कामे पुर्णत्वास आलेली असुन इमारतीचा योग्य लोकोपयोग होण्यासाठी उक्त प्रस्तावास मंजुरी देऊन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१८) :**(१) अंशत: खरे आहे.
गुरुदेव नगर, मोझरी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील दासटेकडी येथे तयार झालेल्या इमारतीमध्ये “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रशिक्षण व संशोधन संस्था” गुरूदेवनगर, मोझरी तालुका तिवसा जिल्हा अमरावती येथे तयार करण्याबाबतचा प्रस्ताव, दि.२८ मे, २०१८ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून शासनास पाठविण्यात आला आहे.

(२) मोझरी विकास आराखड्यांतर्गत दासटेकडी परिसरातील पूर्ण झालेल्या सर्व वास्तुंबाबत शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना नरेगा अंतर्गत मिळणारे मजुरीसाठीचे अतिरिक्त अनुदान वर्क कोड अभावी मिळत नसल्याबाबत

**(४८) १२४६८६ (२३-०७-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना नरेगा अंतर्गत मिळणारे मजुरीसाठीचे १८ हजार रुपयांचे अतिरिक्त अनुदान वर्क कोड अभावी मिळत नसल्याने सुमारे १६ लाभार्थ्यांना उदगीर पंचायत समितीत वारंवार जावे लागत असल्याची बाब दिनांक २३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नरेगा अंतर्गत मिळणारे १८ हजार रुपयांचे अनुदानासाठी संबंधित लाभार्थ्याचा वर्क कोड जनरेट करण्याची जबाबदारी एन.आय.सी.,दिल्ली यांची असताना हेर येथील सुमारे १६ तर उदगीर तालुक्यातील २५० लाभार्थी शासनाच्या तांत्रिक अडचणीमुळे वंचित रहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तांत्रिक अडचण दूर करुन अथवा मॅन्युअली पर्यायी व्यवस्था करुन संबंधित वंचित लाभार्थ्यांना देय अनुदान मिळवून देण्यासाठी दिरंगाई करणाऱ्या मनरेगाचे तांत्रिक सहाय्यक वा अन्य संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-१०-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन चौकशीत मौजे हेर तालुका उदगीर येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे वर्क कोड जनरेट झाले नसल्यामुळे त्या लाभार्थ्यांचे मस्टर काढण्यास अडचण येत होती. परंतू हि अडचण दूर करण्यात आली असून प्रधानमंत्री आवास योजनामधील ज्या लाभार्थ्यांचे वर्क कोड जनरेट झालेले आहेत, त्या सर्व लाभार्थ्यांचे मस्टर काढण्यात आलेले आहेत. लातुर जिल्हातील सर्व संबधित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे टाकवे (ता. शिराळा, जि.सांगली) येथील जलसेतूंची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४९) १२४८१९ (२४-०७-२०१८). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टाकवे (ता.शिराळा, जि.सांगली) येथील पाटबंधारे विभागांतर्गत मध्यम प्रकल्पाचे डाव्या कॅनॉलवरील जलसेतू स्टीलच्या पत्र्याचे बनविण्यात आल्याने ते जीर्ण असल्याने पाण्याची मोठया प्रमाणात गळती होत असल्याने सदर जलसेतूंची आरसीसीमध्ये पुनर्बांधणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी आंदोलने करुन संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांकडे लेखी स्वरुपात निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलसेतूंच्या पुनर्बांधणीसाठी सांगली पाटबंधारे मंडळाकडे निधीची उपलब्धता होत नसल्याने उक्त कामे प्रलंबित राहिली असून तेथील ग्रामस्थांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार टाकवे तलाव्याच्या जलसेतूंची पुनर्बांधणी व डाव्या कॅनॉलची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

ओढ्यातील वाहून जाणाऱ्या पाण्याचा सिंचनासाठी लाभ होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

(३) सदर कामाची निविदा निश्चित करण्यात आली असून संबंधित ठेकेदाराने काम सुरू न केल्याने निविदा शर्तीनुसार संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करून सदर कामाची नव्याने निविदा निश्चित करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील काळ - कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या प्रलंबित कामाबाबत

**(५०) १२५११० (२४-०७-२०१८). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील काळ - कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे कामास दि.१५ ऑक्टोबर १९९८ मध्ये सुमारे १०० कोटी अंदाजित खर्चास शासनाने मंजूरी दिल्यानंतर दि.१७ नोव्हेंबर २००६ पासून प्रत्यक्षात कुंभे धरणाच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कुंभे प्रकल्प निर्मिती, कुंभे जलविद्युत बहुउद्देशीय प्रकल्पाची योजना तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री ब्या.ए.आर.अंतुले यांनी आखली होती या प्रकल्पामुळे वर्षभर वीज व पाणी या मूलभूत गरजाचे हमखास निराकरण व कृषी व उद्योगाला चालना मिळून मागासलेल्या कोकणचा विकास झाला असता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी २५८ कोटी ३७ लाख ५१ हजार रूपये खर्चाची प्रशासकीय मंजूरी दिनांक ६ जानेवारी, २०११ रोजी मिळून पुन्हा प्रत्यक्ष कामास सुरूवात होवून दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत सुरूवातीला सुमारे १०० कोटींची कुंभे प्रकल्पाला मान्यता असताना हा प्रकल्प विलंबामुळे २०० कोटी १२ लाख ३७ हजार एवढा अवाढव्य खर्च होवूनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे पुनर्वसन भूसंपादन व वन जमिनी हस्तांतरणाची कामे वगळता उर्वरित सर्व घटक भागाची बांधकामे मे २०१५ पासून बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बंद प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, १५ ऑक्टोबर, १९९८ रोजीचे शासन निर्णयानुसार रु.९७.२४ कोटी अंदाजित किंमतीच्या कुंभे जल विद्युत प्रकल्पात (१X १० मे.वॅट) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
कुंभे प्रकल्पाचा उद्देश जलविद्युत निर्मिती करणे हा आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
प्रकल्पावरील खर्च तृतीय सुप्रमा किंमतीपेक्षा जास्त असल्याने सदर प्रकल्पावरील बांधकामे स्थगित ठेवण्यात आली आहेत.
(५) काळ व कुंभे जविप्रच्या प्रस्तावित चतुर्थ सुप्रमाबाबत सद्यास्थितीमध्ये राज्य तांत्रिक सल्लागार समिती कक्ष, पुणे येथे छाननी प्रगतीपथावर आहे.
मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०९/०६/२०१६ रोजी झालेल्या मा.मुख्यमंत्री फ्लॅगशीप कार्यक्रम आढावा बैठकीच्या इतिवृत्तानुसार काळ(१x१५M.W.) व कुंभे (१x१० मे.वॅट) जलविद्युत प्रकल्पावर शासनामार्फत गुतवणूक न करता प्रकल्प BOT पध्दतीने करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही समांतररित्या प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.